**राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ नुसार यशदा, पुणे(शिखर संस्था) तसेच विभागीय व जिल्हा स्तरावर घोषित करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांचे निवासी प्रशिक्षण शुल्काचे दर सुधारित करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः टीआरएन-२०२३/प्र.क्र.६६/२३/१२-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २७ सप्टेंबर, २०२३

**वाचा:-**

1) **शासन निर्णय क्रमांकः टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११.**
2) **शासन निर्णय क्रमांकः टिआरएन-२०११/प्र.क्र.२८७/११/१२-अ, दि.१४.१०.२०१३.**
3) **शासन निर्णय क्रमांकः टिआरएन-२०१४/प्र.क्र.१२०/२०१४/१२-अ, दि.१३.०८.२०१४ व दि.१२.०९.२०१४.**
4) **शासन निर्णय क्रमांकः टिआरएन-२०१४/४४०/प्र.क्र.६६/१४/१२-अ, दि.०१.११.२०१४.**
5) **शासन निर्णय क्रमांकः टिआरएन-२०२२/प्र.क्र.६२/२२/१२-अ, दि.०४.०७.२०२२.**
6) **महासंचालक, यशदा पुणे यांचे पत्र क्रमांक राप्रनिमूयं/२०२३-२४/साप्रवि-पव्य/प्र.क्र.०३/२८९, दि.१४.०६.२०२३.**

**प्रस्तावना :-**

राज्य प्रशिक्षण धोरण २०११, संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण धोरणानुसार राज्यात ३ स्तरावर प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. यशदा, पुणे ही शिखर संस्था असून ६ विभागीय स्तरावर ७ प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व ३४ जिल्ह्यात ३४ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर संस्थांमधून राज्यातील सर्व वर्ग १ ते ४ च्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना प्रशासकीय प्रशिक्षण देण्यात येत आहे. संदर्भाधीन क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिखर प्रशिक्षण संस्था यशदा, पुणे करिता प्रशिक्षण शुल्क दर रु. २०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी, विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण शुल्क दर रुपये १५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण शुल्क दर रु. १०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी असा विहीत करण्यात आला होता.

यशदा, पुणे यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ६ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने यशदा, पुणे तसेच विभाग व जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता निवासी प्रशिक्षण शुल्काचे दर सुधारित करण्याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

Scanned with OKEN Scanner

## शासन निर्णय:-

राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत तीन स्तरावर घोषित करण्यात आलेल्या प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी निवासी प्रशिक्षण शुल्क दर सन २०२४-२५ या वित्तीय वर्षापासून पासून खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.:-

**अ. राज्यातील शिखर प्रशिक्षण संस्था, यशदा, पुणे साठी प्रशिक्षण शुल्क:-**

यशदा, पुणे या संस्थेचे विद्यमान प्रशिक्षण शुल्क रु. २०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी इतके आहे. सदर प्रशिक्षण शुल्क दर **रु. २५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी** असा राहील.

**ब. विभाग स्तरावरील विभागीय प्रशिक्षण संस्थांसाठी प्रशिक्षण शुल्क:-**

विभागीय स्तरावरील विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचे विद्यमान प्रशिक्षण शुल्क रु. १५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी इतके आहे. सदर प्रशिक्षण शुल्क दर **रु. १८००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी** असा राहील.

वरील **अ** व **ब** साठी ठरविण्यात आलेल्या प्रशिक्षण शुल्कात अंतर्भूत असणा-या बाबी खालीलप्रमाणे आहेत:-

| प्रशिक्षण पूर्व बाबी | | |
|---|---|---|
| १. Training Needs Analysis (TNA) अहवाल लेखन | २. प्रशिक्षण आराखडा | |
| ३. प्रशिक्षण वाचन साहित्य | ४. प्रशिक्षण साहित्य निर्मिती | |
| **प्रशिक्षण दरम्यान बाबी** | | |
| १. निवास व्यवस्था | २. अल्पोपहार व भोजन व्यवस्था | ३. सभागृह व वर्ग खोली शुल्क |
| ४. संगणक कक्ष | ५. नोंदणी व स्वागत शुल्क | ६. तज्ञ व न्यायिक सल्लागारांच्या भेटीचे मानधन / प्रशिक्षकांचे मानधन |
| ७. तज्ञ सल्लागारांच्या भेटी दरम्यानचा व इतर प्रवास खर्च | ८. लेखन साहित्य छपाई खर्च | ९. दृक - श्राव्य साधन पुरविण्यासाठीचा खर्च |
| १०. ग्रंथालय खर्च | ११. व्यवस्थापन खर्च | १२. पाणी पुरवठा व वीज बिल खर्च |
| १३. कार्यालयीन खर्च | १४. दुरुस्ती व देखभाल खर्च | १५. सुरक्षा खर्च |
| १६. अभिलेख कक्ष व माहिती संचयिका )TPMC Charges) | १७. गुणवत्तापूर्वक प्रशिक्षणावरील नियंत्रण खर्च | १८. आकस्मिक खर्च (कार्यक्रमांचे उद्घाटन, समारोप, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रमाणपत्र देणे) |
| १९. अतिरिक्त सुविधा (खेळाची सुविधा, वैद्यकीय सुविधा व इंटरनेट, इंट्रानेट दूरदर्शन दूरध्वनी इत्यादी सुविधांवरील खर्च | | |
| **प्रशिक्षणानंतरच्या बाबी** | | |
| १. परीक्षण व मुल्यमापन | | |



Scanned with OKEN Scanner

**क. <u>जिल्हा स्तरावरील जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी प्रशिक्षण शुल्क:-</u>**

जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचे विद्यमान प्रशिक्षण शुल्क रु. १०००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी इतके आहे. सदर प्रशिक्षण शुल्क दर **रु. १२००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी** असा राहील.

जिल्हा स्तरावरील जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या वेगवेगळ्या विभागांच्या तांत्रिक प्रशिक्षण देणा-या संस्था आहेत. सदर संस्थांना जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचा दर्जा तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आला आहे. सदर संस्थांपैकी ब-याच संस्थामध्ये निवासी स्वरुपाचे प्रशिक्षण सद्यस्थितीत होत नाही. तसेच, या संस्थांकडे स्वत:च्या पायाभूत व इतर सोयिसुविधा अजून पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे या संस्थांना त्यांच्यासाठी ठरविण्यात आलेले रु. १२००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी असलेले प्रशिक्षण शुल्क सरसकट लागू करणे योग्य होणार नाही. त्यामुळे पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या विविध बाबींच्या उपलब्धतेनुसार त्यांच्या समोर दर्शविलेल्या टक्केवारीनुसार प्रशिक्षण शुल्क सदर संस्थेने आकारावे.

त्यानुसार नव्याने ठरविण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क व त्यात अंतर्भूत असणा-या बाबी खालीलप्रमाणे आहेत.:-

| संस्थेचे नाव | प्रशिक्षण शुल्काचे सुधारित दर | प्रशिक्षण शुल्कामध्ये अंतर्भूत बाबी | प्रशिक्षण शुल्क टक्केवारी % | प्रशिक्षण शुल्क रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था | रु. १२००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी | **१. <u>प्रशिक्षण पूर्व बाबी</u>** | | |
| | | १. Training Needs Analysis (TNA) अहवाल लेखन | १ | १२ |
| | | २. प्रशिक्षण आराखडा | १ | १२ |
| | | ३. प्रशिक्षण वाचन साहित्य | २ | २४ |
| | | ४. प्रशिक्षण साहित्य निर्मिती | १ | १२ |
| | | **एकूण** | **५ %** | **६०** |
| | | **२. <u>प्रशिक्षण दरम्यान बाबी</u>** | | |
| | | १. निवास व्यवस्था | २० | २४० |
| | | २. अल्पोपहार, भोजन व्यवस्था | ११ | १३२ |
| | | ३. सभागृह व वर्ग खोली शुल्क | ५ | ६० |
| | | ४. संगणक कक्ष | २ | २४ |
| | | ५. नोंदणी व स्वागत शुल्क | १ | १२ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ६. तज्ञ व न्यायिक सल्लागारांच्या भेटीचे मानधन/ प्रशिक्षकांचे मानधन | ५ | ६० |
| | | ७. तज्ञ सल्लागारांच्या भेटीदरम्यानचा व इतर प्रवास खर्च | ५ | ६० |
| | | ८. लेखन साहित्य छपाई खर्च | ४ | ४८ |
| | | ९. दृक-श्राव्य साधन पुरविण्यासाठीचा खर्च | २ | २४ |
| | | १०.ग्रंथालय खर्च | २ | २४ |
| | | ११.व्यवस्थापन खर्च | ३ | ३६ |
| | | १२.पाणी पुरवठा व वीज बिल खर्च | ५ | ६० |
| | | १३.कार्यालयीन खर्च | ५ | ६० |
| | | १४.दुरुस्ती व देखभाल खर्च | ५ | ६० |
| | | १५.सुरक्षा व्यवस्था खर्च | ३ | ३६ |
| | | १६.अभिलेख कक्ष व माहिती संचयिका | १ | १२ |
| | | १७.गुणवत्तापूर्वक प्रशिक्षणावरील नियंत्रण खर्च | १ | १२ |
| | | १८. आकस्मिक खर्च (कार्यक्रमांचे उद्धाटन, समारोप, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रमाणपत्र देणे) | १ | १२ |
| | | १९.अतिरिक्त सुविधा<br>अ. खेळ सुविधा<br>आ. वैद्यकीय सुविधा<br>इ. इंटरनेट, इंट्रानेट, टिव्ही आणि दूरध्वनी | <br>४<br>२<br>४ | <br>४८<br>२४<br>४८ |
| | | **एकूण** | **९१ %** | **१०९२** |
| | | **३. प्रशिक्षणानंतरच्या बाबी** | | |
| | | १. परिक्षण व मूल्यमापन अहवाल | ४ | ४८ |
| | | **एकूण** | **४ %** | **४८** |
| | | **एकूण (१+२+३)** | **१०० %** | **१२००** |



Scanned with OKEN Scanner

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४०१/व्यय ४, दि.११.०८.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार यशदा पुणे, सर्व विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांकरिता लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१००३१४५८१८४६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=522242e2259dbf8fc1aed336674ebf6138607b16aacbbed00301a9e43c62f6c7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=783CA3332598C7E1C28393EA543FA05D9FB77F36A848F4738D12288E105699F4, cn=LEENA ASHISH SANKHE
Date: 2023.10.03 15:00:19 +05'30'

**( लिना संखे )**
**उप सचिव (प्रशिक्षण), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.*
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा, विधान भवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद, महाराष्ट्र, मुंबई.
८. विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९. सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालयीन विभाग.
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.*
१४. सर्व विभागीय आयुक्त.
१५. महासंचालक, यशदा, पुणे-४११ ००७.
१६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र- १, मुंबई.
१७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र- १, नागपूर.
१८. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र- १, मुंबई.
१९. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र- १, नागपूर.



Scanned with OKEN Scanner

२०. सर्व जिल्हाधिकारी.

२१. उप महासंचालक / संचालक, राज्य प्रशिक्षण नियोजन व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे.

२२. सर्व संचालक / विशेष कार्य अधिकारी / प्राचार्य, विभागीय व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था.

२३. सर्व मंत्रालयीन विभाग.

२४. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.*

२५. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.*

२६. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई.*

२७. मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)

२८. अ.मु.स. (सेवा) याचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

२९. निवड नस्ती, कार्या. १२-अ, साप्रवि, मंत्रालय, मुंबई-३२.

* पत्राने



Scanned with OKEN Scanner